जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१५/१२/२०२३
## दि.१४/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे २७५/२०२३,भादविक ३०७,३५२,३२३,५०४,५०६, ३४ |
| **फिर्यादी** | मनोज भगत,वय-३४ वर्षे,रा.कोथरूड पुणे |
| **आरोपीत** | १.सिध्दार्थ संजय मराठे,वय-२६ वर्ष,रा.प्रतिकनगर,पौड रोड,कोथरुड,पुणे (अटक) व त्याचा एक साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/१२/२०२३ रोजी रात्रौ २१/२० वा. पौड रोडवरील म्हसोबा मंदिरा समोरील फुटपाथ जवळ कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा लहान भाऊ गणेश भगत,वय-३७ वर्षे,रा.सदर हा पौड रोडवरील पवन स्वीट मार्ट दुकानातुन खरेदी करून त्याचे घरी येत असताना,सदर ठिकाणी आ.क्र.१ याने गणेश यांस धक्का मारला. त्यावेळी त्याने धक्का का मारला याबाबत विचारणा केल्याचे कारणावरून त्याने गणेश यास हाताने मारहाण केली. त्यानंतर गणेश याने फिर्यादी यांना फोन करून झाले प्रकाराबाबत सांगितल्यानंतर फिर्यादी हे त्यांचा मोठा भाऊ नवनाथ याचेसह त्या ठिकाणी जावुन झालेल्या मारहाणीबाबत विचारणा करून माहिती घेत असताना,आ.क्र.१ याने त्याचे साथीदारासह येवुन,लोखंडी रॉड घेवुन येवुन फिर्यादी यांना तु लय मोठा भाई झालास का,तु कोण मला विचारणारा,तुला आत्ता खल्लास करून टाकतो असे बोलून फिर्यादी व त्यांचे भाऊ नवनाथ व गणेश यांना शिवीगाळ व लाथा-बुक्यांनी मारहाण करून,त्यांना जीवे मारणेच्या उद्देशाने डोक्यात लोखंडी रॉड मारून गंभीर जखमी करून,याला आता जीवंत सोडायचे नाही आजच संपवून टाकु असे म्हणुन पुन्हा लोखंडी रॉडने मारून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जालिंदर फडतरे ७६६६७२९१८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे १३१/२०२३,भादविक ३२३,३४१,५०६,महा.पो.का.क.३७(१)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | अमर घारे,वय-३० वर्ष,रा.गणपती माथा,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | १.प्रसन्न ऊर्फ बाळा मनोज कदम,वय २३ वर्ष,रा.लक्ष्मी शांतीबन सोसा.शिवणे,पुणे २.आदीत्य उध्दव पांचाळ,वय १९ वर्ष,रा.कदम वस्ती,राहुलनगर,शिवणे,पुणे ३.सनी रामप्रताप गुप्ता वय-२१ वर्ष रा.२०२,समर्थ आंगण सोसायटी,शिवणे,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १४/१२/२०२३ रोजी रात्रौ ०१/०० वा.गणेश टायरचे दुकाना समोर,एनडीए रोड, राहुलनगर,शिवणे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे शिंदे पुल येथे रॉयल मराठा प्युअर व्हेज नावाचे हॉटेल आहे. फिर्यादी हे त्यांचे हॉटेल मधील कामगार रुपेश व रमेश यांचेसह मोटार सायकलवरुन उत्तमनगर येथे जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद इसमांनी त्यांना अडवुन,लाथा-बुक्यांनी मारहाण करून, मी इथला भाई आहे,तु साईटला चल तुला दाखवतो असे म्हणुन त्याने जर्किंगचे मागे |

| | |
|---|---|
| | हात घालुन कमरलेला लावलेला लोखंडी धारदार हत्यार बाहेर काढुन,आम्ही कुणाला अडवु, कुणालही मारु,तुला काय करायचे,तु आता गेला नाहीतर तुला खल्लास करुन टाकेन अशी धमकी देवुन,त्यांचे हातातील धारदार हत्यार हवेत फिरवुन दहशत निर्माण केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. दादाराजे पवार ९७३०८४२७७० / ७०२०५८३०७८ |
| **३** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १८९८/२०२३,भादविक ३२४,५०४,५०६,४२७,३४ |
| **फिर्यादी** | अरविंद दोडमिसे,वय ४५ वर्ष,रा.हडपसर,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपीत** | १.एक इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/१२/२०२३ रोजी १८/३० वा.सहयाद्री मोबाईल शॉपी नावाचे दुकान,हॉटेल सैराट बिर्याणीच्या समोर भेकराईनगर,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे सहयाद्री मोबाईल शॉपी नावाचे दुकान असुन,त्यांचा जुना कस्टमर आ.क्र.१ हा त्याचे साथीदारासह फिर्यादी यांचे दुकानात येवुन,फिर्यादी यांना मी तुमच्याकडे सहा महिन्यापुर्वी माझा मोबाईल रिपेअरिंगला टाकला होता तो मला दया. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास मी तुम्हाला तुमचा मोबाईल शोधुन देतो असे सांगितल्याचे कारणावरून त्या गोष्टीचा राग येवुन,सदर इसमांनी आपसात संगनमत करून,फिर्यादीस शिवीगाळ व हाताने मारहाण करून,खोडसाळपणे फिर्यादी यांचा मोबाईल व त्यांचे दुकानातील काचा फोडुन नुकसान केले आहे. तसेच दुकानातील फिश पॉट फिर्यादीचे डोक्यात मारून,त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, एस.जे.ननावरे ९३५९९५१५८२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | पर्वती पो स्टे ३७३/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६५ वर्षे,रा.धायरी,नऱ्हे रोड,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/१२/२०२३ रोजी १६/०० वा. ते १७/०० वा.चे दरम्यान सर्वे नं.१३३,दांडेकर पुल बस स्टॉप ते नऱ्हे येथे पी.एम.पी.एम.एल. बस प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने सर्वे नं.१३३,दांडेकर पुल बस स्टॉप ते नऱ्हे असा बसने प्रवास करीत असताना,सदर बस प्रवासा दरम्यान,कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे नकळत त्यांचे उजवे हातातील सोन्याची बांगडी ३०,०००/- रूपये किंमतीची कशाचेतरी सहाय्याने कापुन चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.टी.जगदाळे ०२०/२४२२०२०५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ६०२/२०२३,भादविक ३८०,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३९ वर्षे,रा.फातीमानगर,वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | फिर्यादी यांचे नातेवाईक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/१०/२०२३ रोजी ते दि.१४/११/२०२३ रोजीचे दरम्यान गंगा संपत्ती,ए-विंग,८०३,फातिमा नगर,वानवडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे वडील,भाऊ यांचे व्यवसायातील तसेच फिर्यादी यांचेकडील नोकरीतील काही रक्कम असे एकुण २८,००,०००/- रूपये रोख रक्कम राहते त्यांचे घराचे बेडरुम मधील लोखंडी तिजोरी मध्ये ठेवलेली असताना,फिर्यादी यांचे नातेवाईक यांनी घराचे कुलूप बनावट चावीचा वापर करुन,त्यावाटे आतमध्ये प्रवेश करुन,तिजोरीचे लॉकर उघडुन, त्यामधील नमुद रोख रक्कम ही चोरी करून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, कदम ७०८३१९६१९५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**